लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

पाहिजेत
पत्रकार, व्हिडीओ एडिटर, स्वागतिका, टेली मार्केटिंग, मार्केटिंग प्रतिनिधी पाहिजेत. पगार 5 ते 25 हजार, शिकावूंसाठीही संधी, कागदपत्रासह भेटा
फोन- 9657069069, 0217-3550592
पत्ता:- F-3 वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १८ वे, अंक २३२ वा | शुक्रवार, दि. २६ एप्रिल २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# लोकसभा निवडणुकीतून राष्ट्रवादी शरद पवार गटाची विधानसभेची गणितं पक्की

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकसभा निवडणुकीचा अनेक राजकीय घडामोडी घडत असून, डाव-प्रतिडाव टाकले जात आहे. लोकसभा निवडणुकीतून अनेकजण विधानसभेची गणितं पक्की करताना दिसून येत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बंडामुळे खिळखिळ्या झालेल्या शरद पवार गटाला लोकसभा निवडणुकीचे 'टॉनिक' मिळाले असून, सोलापूरच्या मोहिते पाटलांसह अनेक बडे नेते पवारांच्या गळाला लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत विधानसभेची गणितं लक्षात घेऊन अनेकजण आता 'पेरणी' करताना दिसून येत आहेत. त्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला सोलापूर जिल्ह्यात तरी सुगीचे दिवस दिसत आहेत.

## बडे नेते लागले गळाला

माढा लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून भाजपमध्ये वादाची ठिणगी पडली आणि अकलूजच्या मोहिते पाटील यांनी भाजपपासून फारकत घेतली. धैर्यशील मोहिते पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करून माढ्यातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मोहिते पाटील यांच्या राष्ट्रवादी प्रवेशाला फलटणच्या नाईक निंबाळकर कुटुंबीयांसह अनेक बड्या नेत्यांनी साथ दिल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे मोहिते पाटील यांचे कट्टर विरोधक, माळशिरसमधील धनगर समाजाचे नेते उत्तम जानकर यांनीही मोहिते पाटील यांना साथ देण्याचा निर्णय घेतला आहे, तोही विधानसभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवूनच.






लोकसभेला मोहिते पाटील यांना साथ द्यायची आणि विधानसभेला उत्तम जानकर यांना मदत करायची, असे दोघांच्या सोयीचे राजकीय गणित दोन्ही गटांकडून मांडले गेले आहे. त्यामुळे जानकर हे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून विधानसभेची आगामी निवडणूक लढण्याची शक्यता आहे. माळशिरसमध्ये जानकर यांच्या माध्यमातून पवारांच्या हाती विधानसभेसाठी एक स्ट्राँग उमेदवार असणार आहे. मोहिते पाटलांची प्रामाणिक साथ मिळाली तर जानकर हे माळशिरसचे आमदार होऊ शकतात.

करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील यांचा शरद पवार यांच्या राष्ट्रवादीमध्ये उद्या (ता. २६ एप्रिल) प्रवेश होणार आहे. नारायण पाटील हे मोहिते पाटील समर्थक म्हणून ओळखले जातात. नारायण पाटील यांचा मागील विधानसभा निवडणुकीत अवघ्या 5 हजार 494 मतांनी निसटता पराभव झाला आहे. त्यामुळे नारायण पाटील यांनी विधानसभेसाठी पुन्हा शड्डू ठोकला आहे.

## अजून एक माजी आमदार लवकरच प्रवेश करणार

गेली 25 वर्षे भाजपमध्ये काम करणारे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जाणारे मोहोळचे संजय क्षीरसागर यांनीही बुधवारी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्यांनी 2014 मध्ये भाजपच्या तिकिटावर विधानसभेची निवडणूक लढवली होती, त्या निवडणुकीत क्षीरसागर यांना 53 हजार 573 मते मिळाली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार राजन पाटील यांच्याशी दोन हात करत मोहोळच्या क्षीरसागर यांनी तालुक्यात भाजप वाढवला. मात्र, भाजपच्या सत्तेच्या काळात त्यांना डावलण्यात आल्याने संजय क्षीरसागर यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत जाणे पसंत केले आहे. त्यांनीही मोहोळमधून विधानसभेची निवडणूक लढविण्याची घोषणा केलेली आहे.

माढ्यातून संजय कोकाटे यांनीही शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. प्रवेशाच्या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीच त्यांच्या उमेदवारीबाबत सूतोवाच केले आहे. ऐनवेळी एखादे मोठे नावही माढा विधानसभेसाठी येऊ शकते. तसेच, मित्रपक्ष असलेल्या शेकापमधील दोन देशमुख बंधूमधील वादही मिटविण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे लोकसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात एकदम 'वीक' वाटणारी शरद पवारांची राष्ट्रवादी निवडणूक विधानसभा निवडणुकीच्या दृष्टिकोनातून एकदम स्ट्राँग दिसून येत आहे.

# करमाळ्यात आज धडकणार शरद पवारांची तोफ

## माजी आ.नारायण पाटील यांचा पक्ष प्रवेश






**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** महाविकास आघाडीचे माढा लोकसभेचे उमेदवार धैर्यशिल मोहीते-पाटील यांच्या प्रचारार्थ शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब यांची आज शुक्रवार दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० वाजता मार्केट यार्ड मैदान करमाळा येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर सभेस माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, बारामती अॅग्रोचे चेअरमन रोहितदादा पवार, यांच्यासह दिग्गज नेते मंडळीसह करमाळा विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, काँग्रेस पक्ष व मित्र पक्षाचे माढा लोकसभा मतदारसंघातील सर्वच नेते या सभेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

यावेळी करमाळा तालुक्याचे माजी आमदार नारायण आबा पाटील हे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार आहेत. करमाळा माढा विधानसभा मतदारसंघातील पाटील गटाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत.या जाहीर सभेस महाविकास आघाडीच्या वतीने सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सोलापूरात कमाल व किमान तापमानात १६ अंशाची तफावत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एप्रिल महिन्यात वाढत जाणारे तापमान आणि रात्री पडणारा पाऊल याचा परिणाम हवामानावर होत आहे. त्यामुळे कमाल व किमाम तापमानात १६ अंशाची तफावत जाणवत आहे. गुरुवार २५ एप्रिल रोजी ४१.१ अंश इतक्या तापमानाची नोंद झाली. याचा परिणाम आरोग्यावर होत असून अंगदुखी, ताप, डोकेदुकी अशा तक्रारी सोलापूरकर करत आहेत. रात्री आणि पहाटे वातावरणात असलेला गारवा आणि दुपारी उन्हाच्या झळांचा अनुभव सोलापूरकर सध्या घेत आहे. शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील



कमाल आणि किमान तापमानात तब्बल १६ अंशांचा फरक आहे. किमान आणि कमाल तापमानात मोठी तफावत जाणवत असून दिवसा उन्हाचा चटका सध्या जाणवत आहे. वातावरणात फारशी आर्द्रता नसल्याने कोरड्या झळांचा त्रास होत आहे. निरभ्र आकाश आणि स्वच्छ सूर्यप्रकाशामुळे उन्हाच्या झळा वाढल्या आहेत. कमी अधिक प्रमाणात रात्री दमट वातावरण असते. पावसामुळे रात्री आणि पहाटेच्या वेळी वातावरणात गारवा असतो. त्यामुळे एकाच दिवसात गारवा आणि उकाड्याचा अनुभव सोलापूरकर घेत आहेत.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार २५ ते २९ एप्रिल दरम्यान फक्त २७ एप्रिल रोजीच पाऊस पडणार आहे. त्यामुळे २७ एप्रिल पर्यंत तापमानात वाढ होऊन पुन्हा तापमानात घट होईल. २७ एप्रिल नंतर पावसाची शक्यता नसल्याने तापमानात पुन्हा वाढ होण्याची शक्यता आहे. यामुळे कमाल व किमान तापमानात आणखी तफावत होण्याचा अंदाज आहे.

# सोलापूर जिल्ह्यात अडीच हजार हेक्टरवर नुकसान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात गेल्या आठवड्यात अवकाळी पावसामुळे शेतीपिकांना मोठा फटका बसला. प्राथमिक माहितीनुसार, २५५२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. त्याशिवाय सुमारे दोन व्यक्तींसह ७२ जनावरांचा मृत्यूही यात झाला आहे. पंचनाम्याचे आदेश दिले आहेत. तसेच नुकसानीचा अहवाल तयार करण्याचे काम वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार या स्वतः या कामाचा आढावा घेत आहेत. एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे



नुकसानीचा आढावा घेत आहोत, पण शासनाकडून कधीपर्यंत भरपाई मिळेल, हे स्पष्टपणे आताच कोणीही सांगू शकत नाही. तोपर्यंत, मृत जनावरांच्या नुकसानीपोटी भरपाई तातडीने वितरित केली जात आहे.
**- मनीषा कुंभार,** निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर

दोन व्यक्तींचा मृत्यू झाला. शासनाने नैसर्गिक आपत्तीच्या काळात निधी वितरित करण्यासंदभार्तील आदेश दिले आहेत. त्यामुळे अवकाळी पावसात मृत व्यक्ती व जनावरांसाठी नुकसान भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पण शेतीच्या नुकसानीचे पंचनामे अजून पूर्ण झालेले नाहीत.

कृषी विभागाकडील प्राथमिक अंदाजानुसार, जिल्ह्यातील अडीच हजार हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यात केळी, आंबे, द्राक्ष अशा पिकांचा समावेश आहे. दरम्यान, पंचनामे वेळेत पूर्ण करून तातडीने अहवाल देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना दिले आहेत. पंचनामे पूर्ण झाल्यावर नेमके किती नुकसान झाले आहे, त्याचा अहवाल शासनाला सादर केला जाईल.

# सोलापूरातील २२ तर साताऱ्यातील १० उमेदवार मैदानात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील चार विधानसभा व सातारा जिल्ह्यातील दोन विधानसभा मिळून अस्तित्वात आलेल्या माढा लोकसभेसाठी यंदा कमालीची चुरस आहे. यंदाच्या निवडणुकीत ३२ उमेदवार मैदानात आहेत. त्यातील २२ उमेदवार सोलापूर जिल्ह्यातील तर १० उमेदवार सातारा जिल्ह्यातील आहेत. एकट्या माळशिरस तालुक्यातून तब्बल आठ उमेदवार खासदारकीच्या मैदानात उतरले आहेत. माढ्याच्या मैदानात ३२ उमेदवार असले तरीही खरी लढत भाजपचे खासदार




रणजितसिंह नाईक निंबाळकर विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यात आहेत. निंबाळकर फलटण तालुक्यातील असून त्यांच्या तालुक्यातून चार उमेदवार आहेत. मोहिते-पाटील माळशिरसमधून असून त्यांच्या तालुक्यातून आठ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. प्रमुख उमेदवारांच्या तालुक्यातून मैदानात उतरलेल्या अपक्ष उमेदवारांचा कोणाला फटका व कोणाला फायदा होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत माढ्यातून धनगर समाजाचे दहा उमेदवार नशीब अजमावत आहेत. त्यामध्ये बसपचे स्वरूप जानकर, सिद्धेश्वर आवारे, रामचंद्र घुटुकडे, संतोष बिचुकले, अशोक वाघमोडे, काशिनाथ देवकाते, धनाजी मस्के, नवनाथ मदने, सचिन जोरे, लक्ष्मण हाके या उमेदवारांचा समावेश आहे. माढा लोकसभा मतदारसंघात मराठा समाजानंतर धनगर समाजाचे दुसऱ्या क्रमांकाचे मतदान आहे. माढ्यातील खासदारकीसाठी धनगर समाज आक्रमक झाल्याचे यातून दिसत आहे.

**सोलापूर जिल्ह्यातील उमेदवार**

धैर्यशील मोहिते-पाटील, सिद्धेश्वर आवारे, गोपाळ जाधव, रमेश बारसकर, रामचंद्र घुटुकडे, अशोक वाघमोडे, काशिनाथ देवकाते, किरण साठे, गिरीश शेटे, सचिन जोरे, धनाजी मस्के, नवनाथ मदने, बळिराम मोरे, भाऊसाहेब लिगाडे, रोहित मोरे, रशीद शेख, गणेश सरडे, राहुल सावंत, विनोद सीतापुरे, सीताराम रणदिवे, हनुमंत माने, लक्ष्मण हाके.

# प्रचारासाठीच्या महायुतीमुळे क्षणभर बुजली मनभेदाची नाती

## तब्बल पंधरा वर्षानंतर बाळराजे पाटील आणि विजयराज डोंगरे एकाच व्यासपीठावर

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** राजकारणामध्ये कधी काय होईल आणि कोण एकमेकांच्या विरोधात उभे राहतील आणि कोण एकमेकांच्या मांडीला मांडी लावून एकाच पक्षाचा प्रचार करतील याचा काही नेम नसतो.

याचा प्रत्यय लोकसभेचे भाजपाचे उमेदवार आ.राम सातपुते यांच्या प्रचार दौऱ्या दरम्यान मोहोळ तालुक्यातील कार्यकर्त्यांना गत दहा दिवसांपूर्वी आला. उमेदवार सातपुते यांच्या मनमिळावू आणि आपुलकीच्या स्वभावामुळे आणि महायुतीचा धर्म प्रामाणिकपणे पाळण्यासाठी राष्ट्रवादीचे युवा नेते आणि लोकनेते कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील आणि जि. प. चे माजी सभापती आणि भाजपचे युवा नेते विजयराज डोंगरे हे दोन युवा नेते भाजप महायुतीच्या प्रचारासाठी एकाच व्यासपीठावर एकमेकांच्या समवेत बसले. आ.राम सातपुते यांच्या एका बाजूला बाळराजे तर दुसऱ्या बाजूला विजयराज डोंगरे बसल्यामुळे उपस्थित कार्यकर्त्यांच्या भुवया उंचावणे साहजिक होते. दोघांनीही आपापल्या भाषणामध्ये एकमेकांच्या नावाचा आदरपूर्वक उल्लेख करून राजकारणातील सांस्कृतिक गरिमा आदर्शवत जपण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे "मोदीजी है तो कुछ भी मुमकिन है" असेच म्हणावे लागेल.



दोन वर्षाच्या महाराष्ट्राच्या राजकारणाच्या पुलाखालून बरच पाणी वाहत गेलं. त्यामध्ये भाजपा शिवसेनेची युती तुटून शिवसेना राष्ट्रवादीसोबत गेली तर नंतर राष्ट्रवादी फुटून निम्मी राष्ट्रवादी भाजपासोबत गेली. तर शिवसेनाही फुटून त्याचे दोन भाग पडून एक राष्ट्रवादीसोबत गेला. तर दुसरा भाजपसोबत सत्तेत राहिला. मोहोळ तालुक्याच्या राजकीय क्षेत्रात राष्ट्रवादी हा सत्तेतील पक्ष राहिला आहे. याच राष्ट्रवादीमध्ये माजी आमदार राजन पाटील आणि ज्येष्ठ नेते मनोहर भाऊ डोंगरे यांचे पॉलिटिकल ट्युनिंग इतके पक्के जमले होते की या दोन नेत्यांनी जवळपास दोन दशके मोहोळ तालुक्याच्या सत्ताकारणावर वर्चस्व अबाधित ठेवलं. मनोहरभाऊंच्या प्रत्येक शब्दाचा मान राजन पाटील यांनी ज्येष्ठ बंधू मानुन आदरपूर्वक राखला तर राजन पाटील यांच्या राजकीय वाटचालीतील अनेक महत्त्वाच्या क्षणी मनोहर भाऊ यांनी खंबीर साथ दिली.

कारण गेल्या पंधरा वर्षांपासून हे दोन्ही युवा नेते एकमेकांच्या अप्रत्यक्ष विरोधात भिन्न दिशेने राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत आणि हे दोन नेते एकाच दिशेने एकाच व्यासपीठावर आणण्याचा चमत्कार आ.राम सातपुते यांच्या सरळमार्गी स्वभावामुळे शक्य झाला.

मोहोळ तालुक्याच्या राजकारणात एक काळ असा होता की राजन पाटील आणि मनोहर डोंगरे हे दोन दिग्गज नेते एकमेकांशी अतुट भावबंधाने संलग्न असल्यामुळे विरोधकांना यांच्यामध्ये फूट पाडणे सहजासहजी जमले नाही. मात्र दोघांच्या राजकीय कारकीर्दीत जेव्हा त्यांच्या दोन्ही सुपुत्रांचा उदय झाला त्यावेळी समज गैरसमजातून दोघेही युवा नेते एकमेकापासून अंतर ठेवुन राहू लागले.

विशेष म्हणजे जिल्हा परिषदेचे सर्व अधिकार मनोहरभाऊंना असायचे त्यांच्याच मार्गदर्शनाखाली बाळराजेंनी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्षपद सक्षमपणे भूषवले. विशेष म्हणजे शिक्षण आणि आरोग्य समितीचे सभापतीपद देखील त्यांनी अनेक चांगले निर्णय घेऊन राज्यभर गाजवले. साखर कारखानदारीचा गाढा अभ्यास असलेल्या राजन मालक यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या लोकनेते कारखान्याच्या चेअरमन पदाची धुरा विजयराज डोंगरे यांनी अत्यंत कौतुकास्पदरित्या सांभाळली. त्यांनी पंचायत समितीच्या सभापतीपदी देखील खूप चांगले काम केले. मात्र दोघांच्याही जवळच्या कार्यकर्त्यांना दोघा युवा नेत्यांनी स्वतःच्या बळावर राजकारणात सक्रिय व्हावे अशी महत्त्वकांक्षा असल्याने दोघा युवा नेत्यांना एकमेकापासून दूर व्हावे लागले.

मात्र सध्या महाराष्ट्रात जे खालच्या (पान 2 वर..)



## संपादकीय

# लक्ष्य विधानसभाच !

सध्या देशामध्ये लोकसभा निवडणुकीचे वारे वाहत असले, तरी या वाऱ्यामध्येसुद्धा आगामी कालावधीमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीचे लक्ष्य ठेवूनच काम केले जात आहे. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर आगामी कालावधीमध्ये ज्या राज्यांमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहेत त्या राज्यांमधील प्रादेशिक पक्षही या लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने विधानसभा निवडणुकीचीच तयारी करत आहेत. या लोकसभा निवडणुकीला आम्ही फक्त दहा जागाच लढवत आहोत कारण आमचे लक्ष्य विधानसभा निवडणूक आहे, अशी स्पष्ट माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे नेते शरद पवार यांनी दिली आहे. दुसरीकडे, महाराष्ट्रात सत्तेवर असलेल्या महायुतीतील अजित पवार गट आणि शिवसेना एकनाथ शिंदे गट यांनीसुद्धा लोकसभा निवडणुकीसाठी जी तडजोड केली आहे त्याची भरपाई त्यांना विधानसभा निवडणुकीत मिळण्याची आशा आहे. आता महायुतीचा मित्र झालेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राज ठाकरे यांनीसुद्धा लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीला पाठिंबा देण्याची घोषणा करताना कार्यकर्त्यांना विधानसभा निवडणुकीची तयारी करण्याचे आदेश दिले. साहजिकच या लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने आगामी विधानसभा निवडणुकीची समीकरणे जुळवण्याची तयारी आतापासूनच सुरू झाली आहे. रायगडसारख्या लोकसभा मतदारसंघामध्ये राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांना सर्व प्रकारची मदत करण्याची हमी देताना एकनाथ शिंदे गटाचे नेते भरत गोगावले यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये आम्हाला सुनील तटकरे यांच्याकडून सर्व प्रकारच्या मदतीची अपेक्षा आहे, असे स्पष्टपणे सांगितले आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे यावेळी अनेक राजकीय पक्षांनी लोकसभा निवडणुकीसाठी अनेक विद्यमान आमदारांना उमेदवारी दिली असल्यामुळे हे आमदार जर खासदार झाले तर त्यांच्या रिक्त ठिकाणी विधानसभा निवडणुकीचे कोणाला संधी द्यायची याची जुळवाजुळवही आतापासूनच सुरू झाली आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये लोकसभेचे 48 मतदार संघ आणि विधानसभेचे 288 मतदार संघ असल्याने सर्वसाधारणपणे एका लोकसभा मतदारसंघामध्ये सहा विधानसभा मतदारसंघ अंतर्भूत असतात आणि या प्रत्येक विधानसभा मतदारसंघामध्ये लोकसभा निवडणुकीमध्ये कोणाला किती मते मिळाली याची स्पष्ट माहिती मतमोजणीनंतर मिळते. यानिमित्ताने त्या मतदारसंघातील आमदाराची विद्यमान ताकदही मोजली जाऊ शकते. या मतमोजणीनंतर विधानसभा मतदारसंघातील मतदारांच्या कलाबाबत काही त्रुटी समोर आल्या असतील, तर विधानसभा निवडणुकीपर्यंत त्यात दुरुस्ती करण्याची संधीही आमदारांना उपलब्ध होते. लोकसभा निवडणुकीमध्ये आपल्या आघाडीच्या किंवा आपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या पाठीशी उभे राहत असताना आपल्या मतदार संघातील किती मतदार आपल्या पाठीशी सध्या आहेत हे जाणून घेण्याचेही काम या निमित्ताने आमदारांना करता येणार आहे. एखाद्या आमदाराने त्याच्या मतदारसंघामध्ये लोकसभा उमेदवाराला मोठ्या प्रमाणात आघाडी दिली, तर या आमदाराची विधानसभा निवडणुकीसाठीची परिस्थिती चांगली आहे असा अंदाज सहजपणे काढता येऊ शकतो.

आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये उमेदवारांची निवड करताना हा एक निकष वापरला जाऊ शकतो याची जाणीव असल्यानेच सर्व विद्यमान आमदार सध्या लोकसभा निवडणुकीमध्ये आपली ताकद दाखवण्यासाठी झटत आहेत. महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये लोकसभा निवडणुकीनंतर काही महिन्यांतच विधानसभेची निवडणूक होणार असल्याने लोकसभा निवडणुकीमध्ये विधानसभेची गणिते मांडली जातील. पण यानिमित्ताने विधानसभा निवडणुकीवर लक्ष ठेवत असतानाच लोकसभा निवडणुकीमध्ये मतदारसंघ आणि उमेदवार निश्चिती करत असताना जो गोंधळ झाला आहे त्या प्रकारचा गोंधळही गृहीत धरावा लागणार. लोकसभा निवडणुकीचा पहिला टप्पा पार पडला असला, तरी महाराष्ट्रामध्ये महायुती आणि महाविकास आघाडीने आपल्या सर्वच उमेदवारांच्या नावांची घोषणा केलेली नाही. त्यांपैकी काही जागांचा घोळ कायम आहे. या जागांचा घोळ मिटवण्यासाठी विधानसभा निवडणुकीचे समीकरणच लक्षात घेतले जाणार आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये योग्य सन्मान करण्याच्या अटीवर लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपाला पूर्णविराम दिला जाईल, असे दिसते. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीने त्यांच्या काही मित्र पक्षांना स्थान दिलेले नाही; पण विधानसभा निवडणुकीमध्ये या मित्र पक्षांचा चांगला सन्मान केला जाईल अशी अपेक्षा आहे. विशेषतः महाराष्ट्रात राजकारणासाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाला लोकसभा निवडणुकीमध्ये एकही जागा देण्यात आली नसली, तरी त्याची भरपाई त्यांना विधानसभा निवडणुकीत करून द्यावी लागणार आहे. आणखी काही छोट्या मोठ्या पक्षांची गरजही विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पूर्ण करावी लागणार आहे. आपल्या पक्षांसाठी लोकसभा निवडणुकीपेक्षाही विधानसभा निवडणूक महत्त्वाची असल्याची बाब शरद पवार किंवा राज ठाकरे यांच्यासारख्या नेत्यांनी अजिबात लपवलेली नाही. कारण पक्षांची खरी ताकद विधानसभा निवडणुकीमध्येच आजमावली जाणार आहे. लोकसभा निवडणूक आणि विधानसभा निवडणुकीचे प्रश्नही अनेक वेळा वेगळे असल्याने या राजकीय पक्षांना विधानसभा निवडणुकीमध्ये आपल्या प्रचाराची दिशाही बदलावी लागणार आहे. अर्थात, लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीनंतरच खऱ्या अर्थाने या सर्व राजकीय पक्षांना आपली विद्यमान राजकीय ताकद काय आहे हे लक्षात येणार आहे आणि आगामी सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये त्यामध्ये दुरुस्ती करण्याची संधीही उपलब्ध होणार आहे.

विधानसभा निवडणुकीमध्ये जागावाटप आणि उमेदवारी निवड यामध्ये आपला वरचष्मा राहावा यासाठी लोकसभा निवडणुकीतील यश हाच निकष वापरला जाण्याची शक्यता खूपच असल्याने सर्वच राजकीय पक्षांच्या आमदारांनी आणि दुसऱ्या क्रमांकावरील मते मिळवलेल्या पराभूत उमेदवारांनीसुद्धा या निवडणुकीमध्ये आपली ताकद दाखवून देण्याचे नियोजन केले आहे. त्यामुळेच सध्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार केला जात असला तरी सर्वांचे लक्ष मात्र विधानसभा निवडणुकीकडेच आहे आणि सर्वांचे लक्ष्यही आगामी विधानसभा निवडणूक हेच आहे.

# बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही जाऊ शकतो. मागील वर्षी खारघर मध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. मागील वर्षी उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकरांना जीव गमवावा लागला होता. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील काही दिवस राज्यातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे. कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ अशा घटना वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षात ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो. पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही. कधीकधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. काँक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत. निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

पान १ वरून

## प्रचारासाठीच्या महायुतीमुळे...

पातळीची टीका आणि अत्यंत हीन भाषेत आरोप प्रत्यारोप होतात तसे या दोन्ही घराण्यांनी राजकारणासाठी कधी केले नाहीत.काही नाठाळ कार्यकर्त्यांनी या फारकतीला अप्रत्यक्षरीत्या गटबाजीचे स्वरूप देत दोन्ही युवा नेत्यांना चार पाच वर्षात एकमेकापासून इतके दूर नेले की त्यांनी एकमेकांना या पंधरा वर्षात कधी बोलणंही पसंत केलं नाही. आणि विशेष म्हणजे हे दोघेही एकमेकांचे निकटचे स्नेही आहेत हे वेगळे सांगायची आवश्यकता नाही. गत चार वर्षांपूर्वीच भाजपासोबत गेलेले शेटफळकर डोंगरे परिवारातील जि प बांधकाम समितीचे माजी सभापती विजयराज डोंगरे यांनी भाजपामध्ये प्रवेश करून मोहोळ तालुक्याच्या राजकारणात अनगरकरांपासून अलिप्त होत आपला सावता सुभा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कधी भीमा परिवारासोबत जाणं पसंत केलं तर कधी राष्ट्रवादीच्या अन्यविरोधकांशी आघाडी करून राजकारणात सक्रिय राहणं पसंत केलं. आता ते ज्या भाजपात आहेत त्याच भाजपाशी अनगरकरांशी महायुती असल्यामुळे या दोन्ही घराण्यातील सुपुत्रांना भाजपा उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारात एकाच व्यासपीठावर यावं लागलं दोघांनीही आपापल्या भाषणात एकमेकांचा पदासह उल्लेख केला. जवळपास तेरा वर्षानंतर हे दोन युवा नेते एकमेकांसमोर एकाच व्यासपीठावर बसलेले त्यांच्या कार्यकर्त्यांना पहावयास मिळाले.

## स्थिर सर्वेक्षण पथकाकडून सुमारे दीड लाख रुपयांची रोकड जप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकसभा निवडणुक 2024 च्या अनुषंगाने निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे प्रभावी अंमलबजावणी सह कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी. तसेच जिल्ह्यात प्रवेश करणाऱ्या वाहनांची तपासणी करून त्यात अवैद्य बाबी किंवा रक्कम आढळून आल्यास योग्य कारवाई करण्यासाठी स्थिर सर्वेक्षण पथकाची स्थापना करण्यात आली आहे. टेंभूर्णी (भीमानगर) ता. माढा येथे स्थिर सर्वेक्षण पथकाकडून सुमारे एक लाख एकोनपन्नास हजार पाचशे रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. टेंभूर्णी (भीमानगर) ता. माढा या ठिकाणी फॉर्च्युनर (एमएच 04 एफव्ही 8666) गाडीच्या डिक्कीत रोख रक्कम दिसून आली. सदर रोख रकमेबाबत वाहनचालक रमेश शिवराम चव्हाण (रा. दिवा, जि. ठाणे) यांना विचारणा केली असता त्यांच्याकडे कोणताही पुरवा आढळला नसल्याने सदर रकमेचा पंचनामा करण्यात आला. यामध्ये 500 रुपयाच्या नोटाचे तीन बंडल सापडले. सदर बंडलची मोजणी केली असता 500 रुपयाच्या 299 नोटा असे एकूण एक लाख एकोणपन्नास हजार पाचशे सापडले. सदर रक्कम टेंभूर्णी पोलीस स्टेशन येथे सुपूर्त करण्यात आली आहे. ही कारवाई पथक प्रमुख जयवंत नलावडे व पोलीस उपनिरिक्षक कुलदिप सोनटक्के यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

## मुंबई उपनगर जिल्ह्यातील चार मतदारसंघात आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील २६- मुंबई उत्तर, २७- मुंबई उत्तर पश्चिम, २८- मुंबई उत्तर पूर्व, २९- मुंबई उत्तर मध्य या चार मतदारसंघात शुक्रवार दि. २६ एप्रिल २०२४ पासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होईल. त्यासाठीची तयारी संबंधित चारही लोकसभा मतदारसंघांचे निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा निवडणूक यंत्रणेने केली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी दिली. लोकसभा निवडणुकीची अधिसूचना २६- मुंबई उत्तर, २७- मुंबई उत्तर पश्चिम, २८- मुंबई उत्तर पूर्व, २९- मुंबई उत्तर मध्य या चार मतदारसंघांचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातील सूचना फलक, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय येथील सूचना फलकावरही प्रदर्शित करण्यात येणार आहे, अशी माहिती निवडणूक यंत्रणेने दिली आहे. लोकसभेच्या या निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यात २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्यास २६ एप्रिल २०२४ पासून सुरुवात होईल. ३ मे २०२४ पर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येतील. दिनांक ४ मे २०२४ रोजी दाखल उमेदवारी अर्जांची छाननी होईल. त्यानंतर ६ मे २०२४ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची मुदत असेल.

## आई-वडिलांचा सांभाळ न केल्यास मुलाच्या नावावरील मालमत्तेचे खरेदीखत, बक्षीसपत्र रद्द होईल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पालक आणि ज्येष्ठ नागरिकांची देखभाल आणि कल्याण कायदा-२००७ नुसार वयाच्या ६० वर्षानंतर मुले आपल्याला सांभाळत नसल्यास आई-वडिलांनी मुलांच्या नावे केलेली मालमत्ता पुन्हा परत देण्याचा अधिकार प्रांताधिकाऱ्यांना आहे. संबंधित ज्येष्ठ नागरिकाने प्रांताधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केल्यास सुनावणीअंती कितीही वर्षांपूर्वी मुलांच्या नावे केलेले बक्षीसपत्र, खरेदीखत रद्द होते. त्यासाठी एक रुपयाही खर्च येत नाही.

वडिलोपार्जित मालमत्ता नियमानुसार त्या व्यक्तीच्या मुलांच्या नावे होते, पण त्यातही मुला-मुलींना समान हक्क असतो. पण, अनेकदा मुलांच्याच नावे जमीन, मालमत्ता केली जाते. अनेक बहिणींनी देखील न्यायालयात धाव घेतल्याची



उदाहरणे आहेत. दुसरीकडे मुले आपल्या आई- वडिलांना गोड बोलून व्यवसायासाठी किंवा नोकरीसाठी कर्ज काढायचे आहे, जमीन विकसित करूयात अशी विविध कारणे देऊन त्यांच्या नावावरील मालमत्ता स्वतःच्या नावे करतात. तोपर्यंत त्यांचा सांभाळ व्यवस्थितपणे केला जातो.

एकदा का मालमत्ता नावावर झाली की, काही दिवसांनी वादविवाद सुरु होतात आणि एक दिवस तोच मुलगा आपल्या वृद्ध माता- पित्यांना घराबाहेर काढतो, ज्यावेळी त्यांना खऱ्या अर्थाने आधाराची गरज असते. पण, अशावेळी कायद्याने त्यांना आधार दिला असून त्याद्वारे त्यांना त्याच मुलाच्या नावावर केलेली मालमत्ता पुन्हा परत मिळविण्याचा अधिकार त्या वृद्ध माता- पित्यांना आहे.

**पोलिसांच्या भरोसा सेलमध्येही वृद्ध पालकांची धाव**

ज्या मुलाला तळहातावरील फोडाप्रमाणे सांभाळले, स्वतः उपाशी राहून त्याला पोटभर घातले, त्याचे शिक्षण केले. आता तो नोकरीला लागला किंवा स्वतःच्या पायावर उभारला. ज्यावेळी आता वृद्ध माता- पित्यांना त्यांचा आधार हवा आहे, त्याचवेळी तो घराबाहेर काढू लागला आहे. त्यातूनच वृद्धाश्रमांची संख्या वाढत असल्याचे चित्र आहे. अनेक वृद्धांनी पोलिसांच्या ह्यभरोसा सेलह्ममध्ये न्यायासाठी धाव घेतल्याचीही वस्तुस्थिती आहे. धक्कादायक बाब म्हणजे ज्या मुलाच्या जन्मावेळी आनंदी झालेल्या आई-वडिलांना तोच मारहाण करीत आहे. काहींनी तर जन्मदात्या आई-वडिलांचा प्रॉपटीर्साठी खून केल्याची उदाहरणे आहेत.

## सोलापूरात मोदींच्या २९, ३० एप्रिल ला होणार सभा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर आणि माढा लोकसभा मतदार संघातील भाजप आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते आणि खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या दोन्ही मतदार संघासाठी सोमवारी (ता.२९) आणि मंगळवारी (ता. ३०) अशा दोन सभा होणार आहेत.

सोलापुरात सोमवारी सकाळी ११ वाजता शहरातील होम मैदानावर सभा होणार आहे. तर माळशिरसमध्ये मंगळवारी सकाळी अकरा वाजता शेतीमहामंडळाच्या मैदानावर ही सभा होईल. गेल्या काही दिवसांपासून भाजप आणि महायुतीकडून लोकसभा निवडणुकीत प्रचाराचा धडाका लावण्यात आला आहे.

सोलापूर शहर मध्यसह सोलापूर शहर उत्तर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, पंढरपूर-मंगळवेढा तसेच मोहोळ या विधानसभा मतदार संघात भारतीय जनता पक्ष आणि महायुतीतर्फे कॉर्नर बैठका, गाव भेटी,



लाभार्थ्यांशी संवाद मतदारांच्या भेटी सुरू आहेत. सोलापुरात माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या कन्या आमदार प्रणिती शिंदे यांच्याशी सातपुते यांची थेट लढत होत आहे.

दुसरीकडे माढा मतदारसंघात विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना पुन्हा मैदानात उतरवले आहे. पण इथले वजनदार नेते मोहिते पाटील गटाने भाजपवर नाराजी व्यक्त करत भाजपला सोडचिट्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला आहे. तसेच मोहिते पाटील घराण्यातील धैर्यशील मोहिते पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसकडून नाईकनिंबाळकर यांना आव्हान दिले आहे. या दोन्ही जागा भाजपने प्रतिष्ठेच्या केल्या आहेत. त्यासाठी पंतप्रधान मोदींच्या सभा या ठिकाणी आयोजिल्याचे सांगण्यात आले.

## खरीप हंगामासाठी मिळणार मोफत खते बियाणे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यंदा पाऊस चांगला पडण्याचा अंदाज असल्याने कृषी खात्याकडून खरीप पेरणीची जोरदार तयारी करण्यात येत आहे. सोलापूर जिल्ह्यात ३ लाख ७७ हजार हेक्टर क्षेत्रात खरीप पेरणी होईल असा अंदाज असल्याने सोयाबीन, उडीद, मूग, तूर, मका आदी ६४ हजार ३०२ क्विंटल बियाणे आवश्यक आहे. संपूर्ण खरीप हंगामासाठी ३ लाख ६७ हजार ३०२ मे. टन इतका विविध प्रकारचा रासायनिक खत उपलब्ध करण्यात येत असल्याचे कृषी खात्याकडून सांगण्यात आले.

मागील चार-पाच वर्षापासून जिल्ह्यात खरिपाच्या पेरणी क्षेत्रात वरचेवर वाढ होत आहे. सोयाबीन पेरणी क्षेत्रात दरवर्षीच भर पडत असल्याचे कृषी खात्याकडील आकडेवारीवरून दिसत आहे.

यंदाच्या खरीप हंगामात एकट्या सोयाबीनचा पेरा १



लाख ११ हजार १६ हेक्टर क्षेत्रात होईल तर त्यासाठी ३८ हजार ८८६ क्विंटल बियाणे (खासगी, महाबीज, घरगुती) आवश्यक असल्याने उपलब्ध करण्यात येत आहे. महाबीज कडून १० हजार क्विंटल बियाणे मागविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

सोयाबीन नंतर जिल्ह्यात तुरीचे ८६ हजार हेक्टर पेरणी नियोजन करण्यात आले आहे. या क्षेत्रासाठी ५ हजार १५ क्विंटल बियाणे आवश्यक आहे. उडीद पेरणीसाठी ही शेतकऱ्यांचा कल वाढल्याने यंदा ७० हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणीचे नियोजन करीत ५ हजार ६५० क्विंटल बियाणे उपलब्ध करण्यात येणार आहे.

मका जवळपास ६१ हजाराहून अधिक क्षेत्रावर पेरणीचा अंदाज व्यक्त करीत १० हजार क्विंटल बियाणे आवश्यक आहे. बाजरी ४० हजार हेक्टर क्षेत्रात पेरणी होईल व त्यासाठी ९०५ क्विंटल बियाणे, मूग १६ हजार हेक्टर क्षेत्रात पेरणी होणार असल्याने ८७४ क्विंटल बियाणे,

**सूर्यफुलाचे पेरणी क्षेत्र वाढविण्यावर भर**

यंदा सूर्यफुलाचे पेरणी क्षेत्र वाढण्यासाठी कृषी खाते शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणार आहे. मागील वर्षी कसेबसे १९०० हेक्टरपर्यंत झालेले पेरणी क्षेत्र यंदा १३ हजार हेक्टरवर कसे जाईल, यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. त्यासाठी आवश्यक बियाणे मागविण्यात आले आहे.

**खतांची टंचाई भासू नये यासाठी..**

खरीपासाठी सरासरी २ लाख ८ हजार मेट्रिक टन खत आवश्यक आहे. मार्च अखेरपर्यंत १ लाख ३६ हजार ७४३ मेट्रिक टन खत शिल्लक होता. खरीप हंगामासाठी २ लाख २९ हजार ७०० मेट्रिक टन खत मागणी केला आहे. म्हणजे खरीपासाठी ३ लाख ६७ हजार मेट्रिक टन रासायनिक खत उपलब्ध करण्यात येणार असल्याचे कृषी खात्याकडून सांगण्यात आले.

## जाहीरनामा नव्हे शपथनामा ! शरद पवार गटाने कोणती आश्वासने दिली आहेत ? जाणून घ्या घोषणा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** लोकसभा निवडणुकांची तयारी राज्यासह देशात जोरदार सुरू झाली आहे. या दरम्यान आज शरद पवार गटाचा जाहीरनामा प्रसिध्द झाला आहे. त्याला शपथनामा असं नाव देण्यात आलं आहे. यामध्ये अनेक घोषणा देण्यात आल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा आज प्रसारित झाला आहे. पुण्यात पक्षाचे अध्यक्ष शरद पवार प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत



आगामी लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पार्टीचा जाहीरनामा प्रकाशित झाला आहे. यामध्ये महिला, तरुण, तसेच कामगार यांच्यासह जातनिहाय जनगणना, शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव यांच्यासह अनेक मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे.

"आम्ही आज आमचा जाहीरनामा प्रसिद्ध करत आहोत, जे मुद्दे जाहीरनाम्यात समाविष्ट आहेत, ते मुद्दे आमचे नेते संसदेत मांडतील... आमचा जाहीरनामा 'शपथपत्र' या नावाने प्रसिध्द करण्यात आला आहे. महागाई वाढत आहे, शेतकऱ्यांची दुरवस्था झाली आहे, आणि देशात बेरोजगारी आहे. गेल्या दहा वर्षात एजन्सींचा गैरवापर आणि खाजगीकरणासारख्या समस्या वाढत आहेत. या सर्व मुद्द्यांवर आम्ही आमची भूमिका यापूर्वीच व्यक्त केली आहे... आम्ही एलपीजी गॅस, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी करू... आम्ही सत्तेत आलो तर सरकारी नोकऱ्यांमधील रिक्त जागा भरू... महिला आरक्षणावर काम करू... महिलांच्या सुरक्षिततेसाठी कठोर कायदे आणले जातील...", असं बोलताना जयंत पाटील म्हणाले.

**काय आहे जाहीरनाम्यामध्ये ?**

- महिला, मुलींच्या सुरक्षेसाठी कडक कायदे करू
- सरकार आल्यावर कंत्राटी नोकरी भरती बंद करू
- आरोग्यासाठी उत्तम सेवा देऊ
- शेतकऱ्यांसाठी स्वातंत्र आयोग स्थापन करू
- स्पर्धा परिक्षांसाठी आकारलं जाणारं शुल्क माफ करू
- शेती, शैक्षणिक वस्तुंवर जीएसटी आकारणार नाही.
- सत्तेत आल्यावर जातीनिहाय जनगणना करू
- जेष्ठ नागरीकांसाठी आयोगाची स्थापना करू
- महिलांना विधानसभा लोकसभेत आरक्षण देण्याचा प्रयत्न करणार
- शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र आयोग, हमीभाव, आयात निर्यात, कर्जमाफी याबाबतच्या निर्णयासाठी
- शासकीय क्षेत्रात कंत्राटी कामगारांना पायबंद घालणार
- आरक्षणाची ५० टक्यांची अट बदलू
- खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण
- अल्पसंख्यांकासाठी सच्चर आयोगाच्या शिफारशिंसाठी अंमलबजावणी
- शिक्षणाची अर्थसंकल्पीय तरतुद ६ टक्यांपर्यंत करु
- शेती आणि शैक्षणिक वस्तुंवर शुन्य टक्के जीएसटी ठेवणार
- अग्निवीर योजना रद्द करणार

**वात्रटिका**

**घोटाळेबाज**

क्लीन चिट मिळाली
दडपून गेले सगळे...
दोष कुणाचा दोषी कोण
झालेच नव्हते घोटाळे...
यांच्याकडे त्यांच्याकडे
दोन्हीकडे घोटाळेबाज...
निवडावे कोणाला हा प्रश्न
मतदारांना सतावतोय आज...

**हणमंत पडवळ,**
**उस्मानाबाद,**
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

